महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु एक्सलसियर
इमारत, ए. के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दुरध्वनी : ०२२ - २२०१६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org

**महत्वाचे/ईमेलद्वारे-**

क्रमांक: संकिर्ण २२२५/प्र.क्र.०५/प्रनिप्रा/734 दिनांक: 03 JUL 2025

प्रति,
१. महासंचालक, कृषी शिक्षण संचालनालय, मुंबई
२. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई
३. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
४. संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई
५. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
६. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई

**विषय: शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी वेळापत्रक...**

संदर्भ: १. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९(५) मधील तरतुदी.
२. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ११/०६/२०२५ रोजीच्या बैठकीतील विषय बाब क्र. ६ मधील निर्णय.

अधिनियम, २०१५ च्या अंतर्गत येणाऱ्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया व कार्यपध्दती एक-समान असावी. तसेच, शैक्षणिक वर्षातील व्यावसायिक अभ्यासक्रमांनुसार असलेल्या प्रवेश बंद दिनांकाचा विचार करता, दोन भागात प्रवेश मान्यता प्रस्ताव पडताळणी व प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर करण्याचे वेळापत्रक निश्चित करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

त्याअनुषंगाने, संदर्भ क्र. २ नुसार प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ११/०६/२०२५ रोजीच्या बैठकीतील विषय क्र. ६ अन्वये, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर करण्यासाठी अभ्यासक्रमांच्या प्रवेश बंद दिनांकानंतर प्राधिकरणाकडील प्रवेश मान्यतेची प्रक्रिया खालील दोन गटांत दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार राबविण्यास मान्यता देण्यात आली.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर करण्यासाठीचे प्रस्तावित वेळापत्रक

<u>भाग - १ (Group - I)</u>

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १. | व्यावसायिक **<u>तंत्र शिक्षण, कृषी शिक्षण व कला शिक्षण</u>** अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यता प्रक्रियेसाठी गृहित धरण्यात आलेली प्रवेश बंद तारीख | ३१/१०/२०२५ |
| २. | महाविद्यालयांनी प्रवेश मान्यता प्रस्ताव संबंधित संचालकांकडे सादर करण्याचे अंतिम तारीख | १५/११/२०२५ |

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| ३. | संबंधित संचालकांनी प्रमाणित करुन प्रवेश पडताळणी / छाननी प्रक्रिया पूर्ण करण्याची अंतिम तारीख | ३१/१२/२०२५ |
| ४. | संचालकांनी छाननी / पडताळणी करुन प्रमाणित केलेले प्रस्ताव महाविद्यालयांमार्फत प्राधिकरणास सादर करण्याची अंतिम तारीख | २८/०२/२०२६ |

**भाग - २ (Group - II)**

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १. | व्यावसायिक **वैद्यकीय शिक्षण, आयुष शिक्षण व उच्च शिक्षण** अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यता प्रक्रियेसाठी गृहित धरण्यात आलेली प्रवेश बंद तारीख | ३१/१२/२०२५ |
| २. | महाविद्यालयांनी प्रवेश मान्यता प्रस्ताव संबंधित संचालकांकडे सादर करण्याचे अंतिम तारीख | १५/०१/२०२६ |
| ३. | संबंधित संचालकांनी प्रमाणित करुन प्रवेश पडताळणी / छाननी प्रक्रिया पूर्ण करण्याची अंतिम तारीख | २८/०२/२०२६ |
| ४. | संचालकांनी छाननी / पडताळणी करुन प्रमाणित केलेले प्रस्ताव महाविद्यालयांमार्फत प्राधिकरणास सादर करण्याची अंतिम तारीख | ३०/०४/२०२६ |

सोबत - वरीलप्रमाणे

**(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)**
**सदस्य सचिव,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई**

प्रत माहितीकरीता अग्रेषित,

१. मा. अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. प्रधान सचिव, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष, मुंबई.

प्रत आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित, -
१. सर्व संबंधीत प्राचार्य, तंत्रशिक्षण अंतर्गत अभ्यासक्रमाची महाविद्यालये
२. सर्व संबंधीत प्राचार्य, उच्च शिक्षण अंतर्गत अभ्यासक्रमाची महाविद्यालये
३. सर्व संबंधीत प्राचार्य, कला शिक्षण अंतर्गत अभ्यासक्रमाची महाविद्यालये
४. सर्व संबंधीत प्राचार्य, कृषी शिक्षण अंतर्गत अभ्यासक्रमाची महाविद्यालये
५. सर्व संबंधीत अधिष्ठाता/प्राचार्य, आरोग्य विज्ञान अंतर्गत अभ्यासक्रमाची महाविद्यालये
६. सर्व संबंधीत अधिष्ठाता/प्राचार्य, आयुष शिक्षण अंतर्गत अभ्यासक्रमाची महाविद्यालये

प्रत, -
१. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
२. मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे स्वीय सहाय्यक
३. सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना उचित कार्यवाहीसाठी
४. लेखाविभाग यांनी उपरोक्त वेळापत्रकाच्या अनुषंगाने, प्रक्रिया शुल्काची परिगणना करुन संबंधीतांना प्राधिकरणाच्या संगणक प्रणालीमध्ये उपलब्ध करुन द्यावी.
५. निवडनस्ती, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.